## निशाणी क्र.४३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अपीलकार यांनी मयत उत्तरवादी ८ उदय गंगाराम सावंत यांचे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अपीलकार याचे म्हणण्यानुसार प्रस्तुत प्रकरणातील उत्तरवादी क्र.८ हे दि.२४/०९/२०१९ रोजी मुंबई येथे मयत झालेले आहेत. त्यांना अर्जात नमूद केलेल्या वारसांव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. सबब, मयत उत्तरवादी यांचे वारसांना अपीलाचे कामी समाविष्ट करून तशी दुरूस्ती अपील मेमोत करणेस परवानगी मिळणेसाठी त्यांनी विनंती केली आहे.

३. अपीलकार व त्यांचे विद्वान विधिज्ञ एस.एस.गवाणकर व उत्तरवादी यांचे विद्वान विधिज्ञ वाय.आर.खानोलकर यांचा युक्तिवाद ऐकला. अपीलकार यांनी मुदतीमध्ये वारस दाखल केलेले आहेत. त्यामुळे अपीलाचा गुणदोषावर निर्णय होणेसाठी मयत उत्तरवादी क्र.८ यांचे वारस रेकॉर्ड घेणे योग्य व न्यायाचे आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

### — **आदेश** —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत उत्तरवादी क्र.८ उदय गंगाराम सावंत यांचे वारस पटलावर घेणेस परवानगी देण्यात येते.

३. अपीलकार यांनी आवश्यक ती दुरूस्ती अपील मेमोत विहित मुदतीत करावी.

(आर.बी.रोटे)
दि.०७/०४/२०२२
जिल्हा न्यायाधीश—१
सिंधुदुर्ग —ओरोस